श्री हरिहर प्रतिष्ठान संचलित

## गोंविदलाल कन्हैयालाल जोशी (रात्रीचे) वाणिज्य महाविद्यालय, लातूर

# साहित्यातील नवप्रवाह


मुख्य संपादक

डॉ. सुजाता चव्हाण

प्र. प्राचार्य

संपादक

प्रा. आरेफ शेख

प्रा. विद्यादेवी कांबळे




# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| 1. | साहित्यातील नवे प्रवाह<br>चंद्रकांत पाटील | 01 |
| 2. | मराठी साहित्यातील नव प्रवाहः काही मुद्दे<br>डॉ. पृथ्वीराज तौर | 11 |
| 3. | 'काळी आई' तील ग्रामीण जीवन जाणीवा<br>डॉ. भारत हंडिबाग | 18 |
| 4. | शेतकरी दीर्घकाव्यातील सामाजिक विषमता<br>डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे | 25 |
| 5. | जागतिकीकरणातील आव्हानात्मक जाणिवा व्यक्त करणारी कल्पना दुधाळ यांची कविता<br>प्रा.डॉ. चंद्रकांत शेरखाने | 33 |
| 6. | दलित साहित्याचे शक्तीकेंद्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर<br>प्रा. डॉ. अशोक भनुदासराव केंद्रे | 40 |
| 7. | दलित साहित्यातील जीवन जाणीवा व वास्तवत्ता<br>प्रा. डॉ. श्रीकांत गायकवाड | 44 |
| 8. | ग्रामीण साहित्यातील वास्तववादी चित्रण<br>डॉ. रामदिनवार गोविंद शंकरराव | 50 |
| 9. | ग्रामीण साहित्य प्रवाह कांदबरी<br>डॉ.मच्छिंद्र रामचंद्र गोंटे | 60 |
| 10. | ग्रामीण साहित्यातील कादंबरीचे स्वरुप<br>प्रा.डॉ.सहदेव विलासराव रसाळ | 67 |
| 11. | आधुनिक मराठी कवितेतून व्यक्त झालेल्या महानगरीय जाणिवा<br>प्रा. डॉ. संगीता मुंढे | 75 |

# आधुनिक मराठी कवितेतून व्यक्त झालेल्या महानगरीय जाणिवा

प्रा. डॉ. संगीता मुंढे, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

प्रामुख्याने 1960 च्या नंतर मराठी साहित्यात वेगवेगळे प्रवाह पाहायला मिळतात. दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी हे प्रामुख्याने सुरुवातीच्या काळात निर्माण झालेले काही ठळक साहित्य प्रवाह होत. 'साहित्यप्रवाह' म्हणजे 'साहित्यप्रकार' नाहीत. 'प्रवाह' ही संकल्पना साहित्यकृतीतून व्यक्त होणाऱ्या आशयाशी संबंधीत आहे. त्यामुळे एकाच प्रवाहातून अनेक वाङ्मय प्रकारातून लिखान झालेले पाहायला मिळते. वेगवेगळया साहित्य प्रवाहांनी साहित्याचे वेगवेगळे प्रकार समृध्द् केलेले पाहायलाा मिळतात. मुळात मानवी समाज हाच प्रवाही आहे. विकासाचे अनेक टप्पे मानवी समाजाने पार केलेले आहेत. त्या त्या टप्यावर निर्माण होणाऱ्या साहित्याने समाजामध्ये होणारा बदल हा व्यक्त केला आहे. त्या त्या समाजगटाची वैशिश्टये त्यांच्या साहित्यातून वेळोवेळी शब्द्बध्द् होत असतात. त्यामुळे साहित्यही समाजाप्रमाणेच प्रवाही बनत असते.

सुरुवातीच्या काळात शिक्षणाचा प्रसार काही विशिश्ट समाजगटापुरताच मर्यादीत असल्यामुळे साहित्याचा आशयही त्या समाज गटाच्या वैशिश्टया पुरताच मर्यादित होता. स्वतंत्र्योत्तर काळात जसजसा शिक्षणाचा प्रसार झाला तसतसा समाजातील सर्व तळागाळातील तरुण शिक्षण घेवु लागले. त्यामुळे आजपर्यत जो विशिश्ट वर्ग साहित्य निर्मिती करत होता त्याच्या पेक्षा वेगळा वर्ग हा विकास पाऊन साहित्य निर्मिती करु लागला. त्यामुळे या समाज गटाचे साहित्य हे आधिच्या गटाच्या साहित्यापेक्षा सर्वार्थांने भिन्न होते. कारण त्यांचे सामाजिक सांस्कृतीक जिवनच भिन्न होते. त्यामुळे त्या त्या समाज गटाच्या वैशिश्टयांचे चित्रण त्यांच्या साहित्यातून आले. त्यातूनच दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी असे वेगवेळे प्रवाह निर्माण झालेले दिसतात.

Lecturer

आनंद यादव यांच्या मते "समाज हा जसा प्रवाही आहे, तसेच त्या समाजात निर्माण होणारे साहित्य हेही प्रवाही असते. ज्या विरोध विकास सिद्धांतानुसार समाज प्रवाहित झालेला असतो,तोच सिद्धांत नवनव्या वैशिष्ट्यांचे साहित्य निर्माण व्हायला किंवा नवनव्या साहित्य प्रवाहांचा जन्म व्हायला कारणीभूत झालेला असतो. कारण साहित्यात अंतिमतः माणवी मनाचे,जीवनाचे आणि समाजाचे प्रतिबिंब उमटत असते.म्हणून साहित्याचे स्वरुप प्रवाहीच असणार. वेळोवेळी समाजात नवेनवे साहित्यप्रवाह जन्माला येतच राहणार."[1] याच न्यायाने सध्या साहित्यामध्ये निर्माण झालेले कामगार साहित्य, महानगरीय जाणीवेचे साहित्य हे नवप्रवाह पहावयास मिळत आहेत.

एके काळी खेडयांचा देश म्हणून ओळखला जाणारा आपला भारत आज शहराभोवतीच केंद्रित झाला आहे. झपाटयाने शहरे आणि महानगरामध्ये वाढ होत आहे. खेडी ओस पडत चालली आहेत. शहरीकरण झपाटयाने झाले पण त्याचबरोबर अनेक प्रश्नही निर्माण झाले. मोठ मोठया ईमारती, रत्यावरचा दिव्याचा झगमगाट, मोठ मोठया बाजारपेठा, वेगवेगळया सुखसोईची रेलचेल यामुळे नगरांचं आकर्शण दिवसेंदिवस वाढतांना दिसत असलं तरी त्याच वेळी महानगरात अनेक प्रश्नही निर्माण झाले आहेत. शहरात हाताला काम आणि पोटाला खायला मिळत असलं तरी राहायला जागा नाही त्यातूनच झोपडपट्टयांची संख्या वाढत आहे. या झोपडपट्टया अनेक सामाजिक समस्याची माहेरघरं बनली आहेत. अपुरी जागा, विज,पाणी, मोकळी हवा यांची कमतरता, अस्वच्छता यामुळे अनारोग्य या समस्या महानगरात भेडसावत आहेत. गुंडागर्दी ,दादागीरी वैश्याव्यवसाय, व्यसनाधिनता इ. गैरप्रकारांचे माहेरघर म्हणजे आजची महानगरे बनली आहेत. दहशतवादी हल्ले, मारामाऱ्या ट्रॅफिक जाम, मोर्चे, कल्फ्यू हे नित्याचे झाले आहे. त्यामुळे महानगरामध्ये राहणाऱ्या लोकांचे जिवन बेभरवश्याचे झाले आहे. सकाळी घरातून बाहेर पडलेली व्यक्ती घरी सुखरुप परत येईल की नाही याची शाश्वती नाही. कमालिची अस्थिरता जगण्याला प्राप्त झाली आहे. यंत्राच्या सानिध्यात राहून माणूसही यंत्रवत होत चालला आहे. वाढती संवेदनहिनता, अविश्वास, अस्थिरता हे महानगरात राहणाऱ्या लोकांचे जीवन बनले आहे.

वाढत्या लोकसंख्येमुळे पर्यावरणाच्या अनेक समस्या महानगरात निर्माण झाल्या आहेत. महानगरीय जीवनाचा अनुभव घेतलेल्या अनेक कवींनी

आपले अनुभव कवितेतून व्यक्त केले आहेत. महानगरीय कविता म्हणजे काय ते सांगत असतांना माधव पुटवाड म्हणतात,"महीनगरांतील भौतिक विकास आणि वैभवाबरोबरच बकालपणा, भेसळ, भ्रश्टाचार नि प्रदूशण, मूल्यऱ्हास, असुरक्षितता, दंगली, बॉबस्फोट, गोळीबार, मोर्चे, बंद इत्यादींमुळे होत असलेली कोंडी; मानवी जीवनात माणसापेक्षा वस्तूला येत असलेले महत्त्व; टी.व्ही., मोबाईल, कॉम्प्यूटर, लॅपटॉप अशा साधनांच्या सहवासात जाणारा माणसांचा वेळ; माणसामाणसातील वाढलेले अंतर, तुटत जाणारे नातेबंध; भावनाहीनता, स्वकेंद्रितपणा, जीवनमूल्य नि जीवनाबद्दलची उदासीनता; जागतिकीकरणामुळे भाशा, संस्कृतीसकट मानवी जीवनात झालेली गुंतागुंत आणि अशा या सगळया गुंतागुंतीतून आकाराला आलेले अनपेक्षित वास्तव अधोरेखित केले आहे. अशा या गुंतागुंतीच्या महानगरीय जीवनाचे चित्रण करणाऱ्या कवितांना महानगरीय जाणिवेच्या कविता म्हणता येईल."[2] यातून महानगरीय जीवनाची कल्पणा येते.

प्रामुख्याने महानगरीय जीवनाचं चित्रण हे मराठी साहित्यात 1990 च्या नंतर प्रकर्शानं आलेलं दिसते. मराठी कवितेचा विचार केला तर अनेक कवींनी महानगरीय जाणीवेचं चित्राण केले आहे. यात नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, सतीश काळसेकर, अरून काळे, मंगेश काळे, उत्तम कांबळे, श्रीधर तिळवे, हेमंत दिवटे, मन्या जोशी, महेंद्र भवरे, सलील वाघ, वीरधवल परब, मोहन राजापुरे, मनोहर ओक, अशोक नायगावकर वसंत आबाजी डहाके, अरूनचंद्र गवळी, रमेश रावळकर, महेश लोंढे, मल्लिका अमर शेख, प्रज्ञा लोंखडे, सुनंदा भोसेकर, अंजली कीर्तने, नीरजा, अंजली कुलकर्णी ईत्यादी कवींनी महानगरीय जीवनाच्या अनेक पैलूचं चित्रण आपल्या कवितेतून केलं आहे. नारायण सुर्वे यांचे संपूर्ण आयुश्य मुंबईमध्ये गेले. कामगार चळवळीशी त्यांचा जवळून संबंध होता. गीरणी कामगारांचे अनेक प्रश्न त्यांनी आपल्या कवितेतून मांडले आहेत. त्यातून महानगरीय जीवनाची कल्पना येते. महानगरामध्ये वेगवेगळया राज्यातून लोक कामाच्या शोधात येतात त्यामुळे भिन्न भाशिकांची एक वेगळीच भाशा महानगरात उदयास येताना दिसत आहे. संस्कृतीचीही सरमिसळ झाली आहे. याचे चित्रण नारायण सुर्वे यांची कविता करते. अरून काळे हे जागतिकीकरणावर भाश्य करणारे व महानगरीय जीवनाचे चित्रण करणारे एक महत्त्वाचे कवी होत. त्यांचे

'सायरनचे शहर', 'रॉक गार्डन' आणि 'नंतर आलेले लोक' हे तीन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. सायरनचे शहर या कवितेतून कवीने आजच्या महानगरातील भीशण वास्तव चित्रित केले आहे. उदा

"हे शहर....
अ[illegible]शिशीसारखे सकाळी उठणारे
रात्री [illegible]न घास निवांत खाणारे
मौजमजेत जागणारे हे शहर
काल[illegible] कली शिरला माण्सात
मायलेकरं एकमेकाला धरीनाता" (सायरनचे शहर )

यातून महानगरीय ज़ीवन कीती बेभरवश्याचे बनले आहे, किती स्फोटक झाले आहे यांची कल्पना येते. सतीश काळशेकर हेही नव्या पिढीतील महत्त्वाचे कवी आहेत. त्यानी आपल्या अनेक कवितेतून महानगरीय जीवनावर प्रकाश टाकला आहे. सामान्य माणूस अनेक स्वप्ने घेऊन नोकरीच्या शोधात महानगराचा रस्ता धरतो पण नंतर त्याच्या स्वप्नाचा कसा चक्काचूर होतो, जगणे कसे लोढणे बनते याचे चित्रण त्यांची कविता करते. कवी म्हणतात,

"आतील एक एक महाल कलम होत जातो खाजगी कुंड्यांतून
निनावी बाग सार्वजनिक होत जाते घरासमोर कलमातून."

यातून शहरी जीवनाची कल्पना येते. उत्तम कांबळे हे देखील जागतिकीकरणावर भाश्य करणारे व महानगरीय जीवन वास्तव कवितेतून व्यक्त करणारे कवी आहेत. महानगरात होत असलेली माणसांची प्रचंड गर्दी आणि त्या गर्दीत हरवत चाललेली माणूसकी,माणसाचा स्वार्थीपणा याचे चित्रण त्यांची कविता करते. त्यांचा 'जागतिकीकरणात माझी कविता' हा कविता संग्रह प्ररिध्द आहे.

"शब्दांच्या सीमांवर
असंख्य पाटयांची गर्दी
एवढेच पक्ष
आणि संघटनांची नावं
शहराचं विभाजन
किती कणाकणांत झालंय

याचा अंदाज......." (शहरांच्या सीमांवर)

यातून आकाराने वाढत असलेली शहरं अनेक गटा तटात कशी विभागली आहेत याची कल्पना येते.

"रस्त्यावरील माणसांचा महापूर
शिट्टीवर नाचणारा शिपाई.
ब्लॅक कमांडो, व्हाईट कॅट,
देवांची विटंबना, टायगर कॉलिंग,
रोड जॅम, निशेध सभा मोर्चे
माणसांनी माणसासाठी रचलेले" (शहरांच्या सीमांवर)

गर्दीने गच्च भरलेली शहरं किती स्फोटक आणि बेभरवश्याची झाली आहेत याची कल्पना वरील ओळीतून येते.

मोहन राजापुरे यांनी देखील महानगरीय संवेदन कवितेतून व्यक्त केले आहे.हेमंत दिवटे यांचे 'चौतिशीपर्यंतच्या कविता' आणि 'थांबताच येत नाही' हे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. जागतिकीकरण आणि त्याचे जीवनावर झालेले परिणाम प्रामुख्याने त्यांची कविता व्यक्त करते.

उदा : "नेट डाऊन आहे, आपला पत्ता काय?
कित्येक दिवस भेटलोच नाही. फोनही नाही
टीव्ही बंद आहे, क्यूं की सास भी कभी बहू थी"

अशा पद्धतीने बदलत चाललेले नांतेसंबंध, नात्यातील दुरावा, स्वकेंद्रीतता, आधुनिकतेतून आलेली अगतिकता ही त्यांच्या कवितेतून व्यक्त होताना दिसते. अरूणचंद्र गवळी यांनी महानगरातील तृतीयपंथीयांचं जग आपल्या कवितेतून व्यक्त केले आहे. रमेश रावळकर यांनी 'बार संस्कृती' या शहराचा अविभाज्य भाग बनलेल्या विशयावर काव्य लेखन केले आहे. ते म्हणतात,

"हॉटेलमधी काम करतो म्हटल्यावर
बदलून जातो लोकांचा नजरिया
जणू काही मी माणसात वावरण्यालायक नाही
ही अघोशित शिक्षा मारली जाते माझ्या कपाळावर
तरीही मी लपवत नाही माझा चेहरा
मांड ठोकून जातो टेबलावर ऑर्डर द्या हे सांगायला. . . ."

Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)

यातून पोटाच्या शोधात गावाकडून शहराकडे स्थलातरीत झालेल्या तरूणावर कोणतेही काम करण्याची वेळ येते तेंव्हा समाजाचा त्याच्याकडे पाहाण्याचा दृष्टिकोन कसा असतो आणि हे सर्व पचवत तो आयुष्याकडे कोणत्या नजरेने पाहातो याची कल्पना येते. महानगरामध्ये वर्गसंस्कृती अस्तित्वात आली आहे. ही वर्गसंस्कृती जन्मावरून नाही तर आर्थिक स्थरावरून ठरते. याचेही चित्रण आजची महानगरीय कविता करतांना दिसते. काही कवयित्रीनीही आपल्या महानगरीय जाणिवा व्यक्त केल्या आहेत त्यामध्ये मल्लिका अमर शेख या प्रमुख आहेत. त्यांची 'पुन्हा एका शहराची आत्महत्या' ही कविता महानगरीय वास्तवाचे दर्शन घडवते,

"दूर शहर पेटलेलं, मध्ये समुद्र
शहर तगमगत उभं.....
माझ्याकडे स्वप्न आहेत,
पण त्यांना जमीन नाही
तुझ्याकडे जमीन आहे
पण कोण मशागत करणार त्याची?
......शहर पावलं टाकत
हळूहळू समुद्राजवळ जातय....
शहरांच्या आत्महत्या बघून
डोळे थकून गेलेत...." (पुन्हा एका शहराची आत्महत्या : वाळूचा प्रियकर पृ.73)

अनेक स्वप्ने उराशी बाळगून गावाकडून तरूण शहरात येत आहेत पण शहरे त्यांची स्वप्ने पूर्ण करू शकत नाहीत. तेंव्हा निर्माण झालेली कोंडी कवितेतून कवयित्री नेमकेपणे मांडतात.

अजंली किर्तने यांनी शहरामुळे होत असलेली पर्यावरणाची हानी व वाढते प्रदूशण हे कदाचित शहराचाच घास घेणारे ठरेल ही भिती व्यक्त केली आहे.

"या शहराची पुन्हा आखणी करशील तेंव्हा
दडवू नकोस रानाला शहराच्या पोटात
रानाचे निर्जिव फॉसिल्स होतीलच
याची शाश्वती कोणी द्यावी?

त्यापेक्षा राखून ठेव शहराबाहेर
रानासाठी अभयारण्य" (शहराच्या पोटावर : हिरवी गाणी, पृ.74)

प्रज्ञा लोखंडे यांनी 'सलाम बॉम्बे' या कवितेतून माणूसकीशून्य महानगरीय संस्कृतीला उपरोधाने सलाम केला आहे. महानगर या कवितेतून महानगरीय प्रदूशणाने स्त्रीच्या मातन्नत्वालाच धोका निर्माण झाल्याची भिती व्यक्त केली आहे.

"मी जीवाच्या आकांताने घट्ट मिटून घेते
घराची खिडक्या दारं,
मला जपायचीय
त्याच्या तान्हुल्या डोळयांतील
जगण्याची कोवळी धून" (महानगरः अंतःस्थ पृ.09)

पर्यावरणीय प्रदूशण हे सांस्कृतीक प्रदूशणाचे कारण ठरत असल्याचे सूतोवाच वरील ओळीतून केले आहे.

अशा पद्धतीने अनेक कवींनी महानगरे आणि त्यातील गुंतागुंत, जगण्याची झालेली कोंडी, वाढती संवेदनहिनता, जगण्याचं झालेलं बाजारीकरण इत्यादी विशयी आपल्या जाणिवा व्यक्त केल्या आहेत.

## संदर्भ

1) यादव आनंद– 1960नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह,मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे. प्र. आ. 2001 पृ.04

2) पुटवाड माधव (प्रस्तावना) – शब्दरत्न, संपादक :डॉ. मा.मा.जाधव निर्मल प्रकाशन, नांदेड. प्र. आ.2013 पृ.24